# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१४/०१/२०२५

### जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४/०१/२०२५ ते १८/०१/२०२५) **Not Received** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| पाऊस (मिमी) | | | | | |
| कमाल तापमान (अं.से.) | | | | | |
| किमान तापमान (अं.से.) | | | | | |
| ढग स्थिती (आकाश) | | | | | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | | | | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | | | | |
| वाऱ्याचा वेग (कमी/तास) | | | | | |
| वाऱ्याची दिशा (अंश) | | | | | |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १४, १६, १७ व १८ जानेवारी, २०२५ रोजी हवामान कोरडे आणि ढगाळ राहण्याची शक्यता असून दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १२ ते १८ जानेवारी, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशक, बुरशीनाशक यांची फवारणी पावसाचा अंदाज पाहून करावी.<br>• रब्बी पिकांची आंतरमशागत तसेच उपलब्धता आणि गरजेनुसार पाण्याचे योग्य नियोजन करावे.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| हरभरा | घाटे | हरभरा पिकास तुषार सिंचन पद्धतीने योग्य प्रमाणात पाणी द्यावे. त्यामुळे उत्पादनात मोठी वाढ |

| | | |
|---|---|---|
| | भरण्याची अवस्था | होते. पुढील दिवसात हवामान ढगाळ राहण्याची शक्यता आहे, हरभरा पकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच ५ % निबोंळी अर्काची फवारणी करावी. हरभरा पकावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी इंग्रजी **'T'** आकाराचे प्रति हेक्टरी ५० पक्षीथांबे उभारल्यास कड आटोक्यात ठेवण्यास मदत होते. कडीचे प्रमाण जास्त असल्यास त्याच्या रासायनिक नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ४ ग्रम प्रती १० लटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| गहू | कांडी धरण्याची अवस्था | गहू पकाच्या ज्या महत्त्वा च्या अवस्था आहेत त्यावेळी पकास पाणी देणे फायदेशीर ठरते. पुढील दिवसात हवामान ढगाळ राहण्याची शक्यता असल्याने गहू पकावरील मावा कडीच्या नियात्र णासाठी मेटारायाझीयम अनिसोपली कंवा व्हरटीसेलीयम लेकॅनी १.१५ % डब्लू.पी. ४० ग्रॅम प्रती १० लटर पाण्यातून दोन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात. |
| तुर | पक्वता ते काढणी अवस्था | पक्व पकाची काढणी करावी व सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. पुढील दिवसात हवामान ढगाळ राहण्याची शक्यता असल्याने तूर पकावरील शेंग अळीच्या नियंत्रणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टर लावावेत तसेच ५ % निंबोळी अर्काची कंवा २० मली निबोळी युक्त कीटकनाशक अॅझाडीरेक्तीन ०.०३ % , ३०० पीपीएम, ०५ मली प्रती लटर पाण्यात मसळून फवारणी करावी. तुरीमधील शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी /पसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक कड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे. |
| मका | शाखीय वाढ | पुढील दिवसात हवामान ढगाळ राहण्याची शक्यता असल्याने अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% कंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रम प्रती लटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| करडई | फुलोरा अवस्था | मावा कडीचा प्रादुर्भाव दिसून येताच व्यवस्थापनासाठी मेटारेझीम अनिसोप्ली ५० ग्राम कंवा अॅ सफेट १६ ग्रॅम + फेनवलरेट १० मली प्रति १० लटर पाण्यात मसळून फवारणी करावी तसेच अल्टरनेरीया बुरशीमुळे होणार्या करडईच्या पानावरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेनडॅ झम १२% + मॅन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लटर पाण्यातून रोगाची लक्षणे दिसताच फवारणी करावी. |
| कापूस | वेचणीपश्चात अवस्था | गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कापसाची वेचणी झालेल्या क्षेत्रामध्ये कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व प-हाटया उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्यांचा कम्पोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा व खोल नांगरट करावी जेणेकरून कडींच्या अवस्था नष्ट होतील. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | पुढील दिवसात हवामान ढगाळ राहण्याची शक्यता असल्याने वांग्यामध्ये रस शोषक कीडी जसे तुडतुडे, पंढरी माशी, मावा याच्या नियंत्रणासाठी फॉस्फा मडॉन ४० % एस. एस. १५ मली कंवा फेनप्रोप्यथ्रीन ३० % ई. सी. ५ मली या कीटकनाशकाच्या आलटून पालटून फवारण्या कराव्यात. अधूनमधून ५ % निंबोळी अर्कची फवारणी करावी. |
| केळी | | पुढील दिवसात हवामान ढगाळ राहण्याची शक्यता असल्याने केळी पकावर करपा (सगटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून नष्ट करावीत. रोगाची लक्षणे दिसताच प्रोपीकोन्याझोल ५ मली व मनरल ऑइल १०० मली प्रती १० लीटर पाण्यात मसळून फवारणी करावी. त्यानंतर २० दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जंताच्या व व वध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/टोचून घ्यावे. जनावरांचे गोठे उंच ठिकाणी व हवेशीर असावेत. गोठ्यामध्ये भरपूर उजेड व सूर्यप्रकाश राहील अशी व्यवस्था करावी. जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पण्यास स्वछ पाणी द्यावे. |
| *टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :-

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १४.०१.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**